जा.क्र. पोआअ / पशा-4 / रेडीयम वार्षिक दरकरार / 2228 / 2018 अमरावती दिनांक 03 MAR 2018 / 2018

विषय :- पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील एकुण 236 पोलीस मोटार वाहनांचे रेडीयम कामाचे वार्षिक दरकरार करण्याकरिता दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके सादर करणे बाबत.

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवर 141 चार चाकी व 95 मोटार सायकल वाहने असे एकुण 236 मोटार वाहनांचे रेडीयमची कामे करण्याकरिता वार्षिक दरकरार करावयाचा असल्याने दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी ईच्छुक रेडीयमची कामे करणाऱ्या दुकानदारांनी त्यांची दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके या कार्यालयातील पत्रव्यवहार शाखेत दिनांक 10/03/2018 ला 12.00 वाजेपर्यंत (शासकीय सुटी वगळून) सादर करावीत.

पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्र 01) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्र-2) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा विवरणपत्र-1 मध्ये खालील नमुद केलेले कागदपत्रे आढळुन आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

विवरणपत्र-01 च्या लिफाफामध्ये खालील नमुद कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

1. दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.
2. पॅन कार्ड व आधार कार्डची छायांकीत प्रत.
3. यापुर्वी राज्य शासन / केंद्र शासनाशी दरकरार केला असल्यास अनुभव प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.
4. जी.एस.टी. प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.

विवरणपत्र-2 च्या लिफाफामध्ये खालील नमुद वाहनांचे प्रकार व कामाचे प्रकारानुसार रेडीयम कामाचे दरपत्रके असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार व कामाचे विवरण | दर |
|---|---|---|
| 01 | नविन व जुन्या वाहनावर वाहन क्रमांक लिहीने मागे व पुढे | |
| 02 | वाहनाच्या सर्व साईडने लाल / निळा / पिवळा रेडीयम पटटा लावने (रनिंग प्रती फुट) | |
| 03 | वाहनाच्या दोन साईडने महाराष्ट्र पोलीस लोगो तयार करने. | |
| 04 | वाहनाच्या मागे महाराष्ट्र पोलीस लोगो तयार करने. | |
| 05 | बाईन्ट महाराष्ट्र पोलीस लागो तयार करने. | |
| 06 | वाहनाच्या समोर पोलीस नांव लिहने. | |
| 07 | वाहनावर अमरावती शहर पोलीस लिहीने. | |
| 08 | वाहनाला लागलेले जुने रेडीयम काढण्याची मजुरी | |

पोलीस मोटार वाहनांचे कुशनिंग (अपोस्ट्री) ची कामे करण्याकरिता प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबंधीतांना दुरध्वनीव्दारे / ई-मेलव्दारे सूचीत करण्यात येईल.

Scanned by CamScanner

**पोलीस मोटार वाहनांचे रेडीयम कामाचे अटी व शर्ती पुढील प्रमाणे :-**

1. रेडीयम कामाचे दर अधिकृत सर्व्हिसिंग सेंटर पेक्षा जास्त नसावे.
2. पोलीस मोटार वाहनांचे रेडीयम कामाला प्रथम प्राधान्य द्यावे लागेल व त्वरीत प्रभावाने कामे करावे लागेल.
3. रेडीयम केलेल्या कामात दोष निर्माण झाल्यास त्याचे विनामुल्य निराकरण करुन देणे दुकानदारांना बंधनकारारक राहील.
4. रेडीयम कामाचे दरामध्ये सर्व कर समाविष्ट करावे लागेल व त्याप्रमाणे दर सुची दयावी लागेल.
5. रेडीयम कामात बेसिक डिस्काउंट देय असल्यास % चा उल्लेख करावा लागेल.
6. निविदा मंजुरी नंतर आदेश पारीत केल्यानंतर रुपये 100/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करुन दयावा लागेल.

सदरचे पत्र हे या कार्यालयाचे cp.amravati@mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. प्राप्त निविदापैकी निविदा स्विकृत करण्याचा अंतिम अधिकार पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी राखुन ठेवलेला आहे याची कृपया नोंद घ्यावी. तरी ईच्छुक निविदाधारकांनी दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

( प्रदिप चव्हाण )
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
अमरावती शहर

प्रति,

--------------------------------------------

--------------------------------------------

प्रत,

पोउपनि, सायबर सेल,
2/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे संकेतस्थळावर अपलोड करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

Scanned by CamScanner